# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 10/09/2020 (गुरूवार)
(सकाळ)

---

### देवलापार पोलीसांची अवैधरीत्या जनावर वाहतुक करणाऱ्यांवर कार्यवाही

पो.स्टे. देवलापार :– दिनांक 09/09/2020 रोजी सपोनि प्रविण बोरकुटे ठाणेदार पो. स्टे. देवलापार यांना गोपनीय माहिती मिळाली की, मौजा खवासा येथुन नागपूरकडे जनावर वाहतुक होणार आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन सपोनि प्रविण बोरकुटे यांच्या मार्गदर्शनात नेमण्यात आलेले नाकाबंदी करीता पोलीस स्टाफ मौजा मानेगावटेक एनएच 7 रोड येथे नाकाबंदी करीत असतांना खवासा रोडने रात्री 02.15 वा. ते 03.00 वा. चे सुमारास भरधाव वेगाने एक संशयीत वाहन येतांना दिसले तेव्हा मानेगावटेक येथे नाकाबंदी केली असता एम. एच.– 34/ ए.बी – 6942 क्रमांकाची महिंद्रा कंपनीच्या वाहनाची तपासणी केली असता सदर वाहनात 9 गोवंश जातीचे गायी व 2 मृत गोवंश जातीचे गायी 01 बैल असे एकुण 12 जनावरे अत्यंत क्रुरतेने व निर्दयतेने वाहतुक करतांना मिळुन आले. यातील आरोपी नामे– 1) इमरान इसराईल शेख वय 22 वर्ष रा. खवासा त. कुरई, 2) साजिद बशीर शेख वय 22 वर्ष, 3) अनिकेत गुन्नीलाल टेंभरे वय 23 वर्ष आ.क्र. 2 व 3 रा. येरली मोहल्ला तुमसर जिल्हा भंडारा यांच्या ताब्यातुन जनावर कि. 1,00,000/–रू. वाहनाची कि. 5,00,000/–रू. असा एकुण किंमती 6,00,000/– रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलीस नाईक श्री. मुन्ना पांडे, पो.स्टे. देवलापार यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. देवलापार येथे वरील आरोपीविरुध्द कलम 11 (1)(ड)(म) प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा, सहकलम 5(अ), 9 महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम तसेच सहकलम 429, 34 भादवी काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि केशव पुंजरवाड हे करीत आहे.

सदरची कार्यवाही ही नागपुर (ग्रामिण) पोलीस अधिक्षक श्री. राकेश ओला, अप्पर पोलीस अधिक्षक श्रीमती मोनिका राऊत, उपविभागीय पोलीस अधीकारी श्रीमती नयन आलूरकर रामटेक विभाग रामटेक यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक श्री. प्रविण बोरकुटे, पोउपनि श्री पुंजरवाड, पोना मुन्ना पांडे, पोशि कुलदिप आहके, राहूल कॉकरेटवार गजानन जाधव यांनी यशस्वीरीत्या पार पाडली आहे.




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर